म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. २२७५



# गोंदण

…न्ता ज. शेळके

REFBK-0020787
REFBK-0020787

२०६८८
काव्य
७१-८-०५

३४०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

29 OCT 1975
17 DEC 1975
27 APR 1977
19 AUG 1978
16 DEC 1981
10/9/82
7 FEB
17 FEB 1982
28 FEB 1982
14 MAR 1982
20 MAR 1982
18 APR 1982
19 MAY 1982
25 JAN 1984

[क्रु. मा. प.]

# गोंदण

अभिजित प्रकाशन

वि क्र
२२६४

मराठी ग्रंथ संग्रहालय
20688
काव्य

# गोंदण

शान्ता ज. शेळके

REFBK-0020787
REFBK-0020787

© शांता ज० शेळके

किंमत पंधरा रुपये

अभिजित प्रकाशन : २

पहिली आवृत्ती : जून १९७५

मुखपृष्ठ :
पद्मा सहस्रबुद्धे

प्रकाशक :
ल० मो० प्रभुणे
शाकुंतल, साहित्य सहवास
वांद्रा (पूर्व), मुंबई
४०० ०५१

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई
४०० ००४

लताबाईना ....

गेल्या सोळासतरा वर्षांत मी लिहिलेल्या कवितांपैकी निवडक कविता
या संग्रहात समाविष्ट केल्या आहेत.

'वर्षा' आणि 'रूपसी' या दोन कवितासंग्रहांतील
कवितांनंतर मध्यंतरीचा काही काळ काव्यलेखनाच्या दृष्टीने रिता गेला.
नंतर मी पुन्हा कविता लिहू लागले. त्या या कविता.

बऱ्याच वर्षांनी हा कवितासंग्रह रसिकांपुढे ठेवताना संकोच, समाधान, सार्थकता
अशा अनेक भावना मनात दाटून येत आहेत.

श्रीमती लता मंगेशकर यांना हा संग्रह अर्पण करताना
मला खूप समाधान वाटत आहे.

या संग्रहातल्या बऱ्याच कविता 'सत्यकथे'ने प्रसिद्ध केल्या.
संग्रहाची रेखीव छपाई 'मौजे'ची आहे;

'अभिजित' प्रकाशनाने अगत्याने संग्रह प्रकाशित केला.

या सर्वांचे कृतज्ञ आभार.

अक्षय्यतृतीया,
दि. १५-५-७५

शान्ता ज० शेळके

लोट १
कळीं कळी वेचतांना २
उतरत्या उन्हामध्यें ३
एखादा शब्द, एखादा सूर ४
सखी ५
खिडकीपाशीं एक मुलगी ६
देवपाट ७
आजोबा ८
पैठणी ९
स्मरणाच्या पार १०
वण ११
लिंबाच्या पालवींत १२
मालण १३
दूर पायथ्याशीं १७
क्षण १८
चक्र १९
दिशादिशांतून आले २०
रात्र २१
तुझें पाप आणि पुण्य २२
चारही दिशांनीं २३
कांहीं २४
२५ निळें नितळ अभाळ
२६ खूप प्रयासानें आवरावा हुंदका
२७ चांदण्यांत गोंधळलेलें पाणी
२८ दान
२९ भेट
३० सारें संपलें तांडव
३१ उच्चारलेले सारे शब्द
३२ माझ्यापासून कितीदां
३३ आयुष्यांत
३४ चेहरा
३५ निरर्थाच्या क्षणीं
३६ धून
३७ निर्वात
३८ सहजखूण
३९ समंजस
४० त्याला जपण्यासाठिंच
४१ तुझे शब्द माझे शब्द

एकाकी ४२
शब्दामागें उभा अर्थ ४३
शब्द म्हणजे ४४
ढग येतात ४५
प्रत्येक सुकलेल्या पाकळींत ४६
पडदे ४७
रहस्य ४८
रंग ४९
तिरपा क्षण ५०
भूतांतूनच ५१
दुर्भंग ५२
सायुज्य ५३
आलों चालुन प्रांत ५४
काळोखपाणी ५५
आरसा ५६
एकोऽहं बहुस्यां ५७
देणें ५८
५९ बुडणारें कांहीं
६० हिरव्यागार ताटव्यांतून
६१ एक लहान मूल
६२ पन्नाशी उलटूनही
६३ ती·
६४ अतर्क्य
६५ अपरिचित
६६ गूढ
६७ कट
६८ व्रत
६९ समुद्रगंध
७० कारवा
७१ सराटा
७२ कळतें आहे
७३ हें एक झाड आहे
७४ आटपाट
७५ अचानकसा
७६ गेलेल्या असंख्य दिवसांमधून
७७ हवीच का ?
७८ मुकाट
७९ गिचमीड

नातें ८०
आठवणीच्या वासानें ८१
फोर्ट : एक दुपार ८२
तटस्थ ८३
कनॉट प्लेस ८४
पैठण ८५
भूतकाळाचा एक तुकडा ८६
अश्वत्थ ८७
संभव ८८
दरवळत डोळे लागतात ८९
डोंगरावर ९०
निश्चल ९१
फुलें ९२
चांदणें ९३
पाळणा ९४
९५ सावली
९६ कधीं लागले दुर्गम कडे
९७ वळणांतुन वळतो पुन्हां
९८ कोण आलें कोण गेलें
९९ साऱ्याच पायवाटा
१०० हें रान चेहऱ्यांचें
१०१ मरणमहालांतून
१०२ पिकनिक संपत आली आहे
१०३ अनासक्त तारे वारे
१०३ कधींतरी
१०४ ऊन कोवळें
१०४ बाकी

# गोदान

# लोट

उषा उमलत्या फुलांतल्या अन् क्षितिजें मावळणारीं
आवर्तातच गुंतुन फिरुनी दृष्टी भोवळणारी
तुकडे तुकडे वेचुन बघतें चित्र पुरें जमवाया
सावरतें मी मला किती पण प्रयास जाती वाया.

अर्घ्य जसा ओंजळींत धरला जन्म उभा शिणलेला
लोट अनावर येइ मनावर चिंब भिजवुनी गेला
पानोपानीं मंद उन्हाचा उदासीन शिडकावा
क्षणभर मिटला मुठींत, फिरुनी उडून गेला रावा.

# कळी कळी वेचतांना

कळी कळी वेचतांना अशी संध्याकाळ झाली
घराकडे वळणारी वाट अंधारीं बुडाली
सर्पापरी वेटाळतें पायां वाटेचें वळण
नामरूपहीन वृक्ष उमे भीती पांघरून

आंतबाहेर दाटून आल्या घनदाट छाया
चुकलेल्या गुरापरी जीव लागे हंबराया
कळी कळी वेचतांना वेळ गेलीसे टळून
आतां याच्यापुढे कधीं हार व्हायचा गुंफून ?

# उतरत्या उन्हामध्यें

उतरत्या उन्हामध्यें सूर सारे दूर गेले
खिन्न कातरवेळेला वारे सुद्धा जड झाले
दिशादिशांतून आतां जळे काळोखाचा धूप
मन आतुरे बघाया अरूपाचें रंगरूप.

गच्च अबोलपणाची सुटो मिठी जीवघेणी
वाचा स्वयंभू प्रकटो सारीं उतरून लेणीं
नको शब्दांची आरास, नको निरर्थ सोहळा
एक सूर खरा लागो उंच चढवून गळा.

स्वप्न तेवतां डोळ्यांत वर पापणी मिटावी
अनोळखी दुराव्यांत जुनी ओळख पटावी
रक्ताहून सनातन तरी श्वासाहून नवें
असें अंतरीचें गूज आज खोलायला हवें.

आज पाण्याहून व्हावा जीव नितळ निर्मळ
आणि भरून वाहावी तुझ्या छायेशीं ओंजळ.

## एखादा शब्द, एखादा सूर

एखादा शब्द, एखादा सूर
एखादी उत्कट तान
एखादा रंग, एखादा ढग
एखादें हिरवें पान

एखादें असें, एखादें तसें
एखादें नेहमीचेंच
सहज असें नव्यानें कळे
सुटत जातात पेच.

खोलांत कुठें डहुळे कांहीं
हेलावे आंतुन प्राण
चुकल्या तारा जुळती पुन्हां
झरतें अक्षय गान.

अशाच कांहीं एखाद्यासाठीं
निमूट सोसावें सारें
सहज लाभे एखादें फूल
तेवढें वासाला पुरे.

## सखी

स्वप्नामधल्या माझ्या सखी
कोणतें तुझें गांव ?
कसें तुझें रंगरूप ?
काय तुझें नांव ?

कशी तुझी रीतभात ?
कोणती तुझी वाणी ?
कसें तुझ्या देशामधलें
जमीन, आभाळ, पाणी ?

ल्व्हाळ्याच्या मुळांतून
झिरपतांना पाणी—
त्यांत पावलें बुडवून तूंही
गुणगुणतेस का गाणीं ?

सुगंधित झुळका चार
केसांमध्यें खोवून
तूंही बसतेस ऊन कोवळें
अंगावर घेऊन ?

काजळकाळ्या ढगांवर
अचल लावून दृष्टी
तूंही कधीं आंतल्याआंत
खूप होतेस कष्टी ?

कुठें तरी खचित खचित
आहे सारें खास,
कुठें तरी आहेस तूंही
नाहीं नुसता भास.

## खिडकीपाशीं एक मुलगी

कधींतरी खेड्यामधली दिसूं लागते जुनी शाळा
घरट्याकडे पांखरें तशा आठवणी होतात गोळा
लाल कौलारांचें छप्पर, चारच वर्ग भिंतींआड
दिसूं लागतात बागेमधल्या फुलेंवेली—झाड न् झाड.

सायलीचे चमेलीचे सुवास मनभर दरवळतात
गुलाबाच्या किती पाकळ्या देठापासून सहज गळतात
खिडकीपाशीं एक मुलगी स्वतःमध्येंच गढलेली
गालांवरतीं दोन्ही हात : नजर पुस्तकांत बुडलेली.

अंगामध्यें बाळसें खूप, गोल चेहरा, मोठे डोळे
—हरवलेला मधला काळ जिवंतपणें पुन्हा झुळझुळे....
मी तिला खुणा करतें लक्ष वेधून घेण्यासाठीं
कधीं ओठ हंसूं बघतात, कधीं भाळावरतीं आठी.

ती मात्र मुळींदेखील माझ्याकडे बघत नाहीं
खालीं मान घालून सारखें कांहींतरी वाचीत राही
तिची नजर हरवलेली, तिची मुद्रा कासावीस
स्वप्नपक्षी फडफडणारा गालांवरून फिरवी पीस.

खिडकीबाहेर निळें आभाळ, पांखरांचे किलबिल सूर
अर्धकच्चीं तुरट स्वप्नें....क्षितिज जवळ....क्षितिज दूर....
माझे शब्द होतात मुके, गळ्यांतच हुंदके अडतात
पापणीभर पाण्यामध्यें शाळा, वर्ग, मुलगी....बुडतात

## देवपाट

माजघरांत अंधारीं
एक हडपा जुनाट
चिंध्यागाठोड्यांच्या तळीं
लाकडाचा देवपाट

देवपाट झाला जीर्ण
दिसे जागजागीं अंग
गेल्या खपल्या उडून
फिकटला लाल रंग.

बोळक्यांच्या उतरंडी
मध्यें मातीचें बोहलें
पाटावर बाहुलीचें
लग्न थाटांत लावलें.

भातुकलीच्या खेळांत
भिंत पाटाची या केली
चिमुकल्या संसाराला
तिची साउली जाहली

देवपाटाच्या भोवतीं
कधीं बसली पंगत
गोष्टी सांगतां बोलतां
चढे आगळी रंगत.

किती आठवूं साठवूं
अरे जुन्या देवपाटा
तुझ्यामाझ्याही वरून
किती गेल्या काळलाटा !

कधींमधीं भेटायचें
आता असेंच असेंच
शब्दातीत होउनीयां
गूज सांगायचें तेंच.

## आजोबा

आजोबांचें वय आतां
सत्तरीच्या पार गेलें
उभें आयुष्य पिकून
फळ गळाव्या आलें

जुना कसदार देह
बळकट अंगकाठी.
किती पाहिलें....भोगिलें....
सांगे भाळावर आठी.

रितें घर हिंडतांना
भिंती पुढें पुढें येती
भुतें भूतकाळांतलीं
फेर धरून नाचती

कधीं कातरवेळेला
मन उदासीन, मुकें,
धुरकट कांचांआड
दाटे आठवाचें धुकें

अलीकडे रात्र रात्र
दिव्यामध्यें जळे वात
जागणाऱ्या वार्धक्याला
गाथापोथीची सोबत

सुखदुःखांचा हिशेब
वजाबाकी एक झाली
कांहीं हातांत ना आलें
शून्यें शून्यांत मिळालीं

तरी आजोबांच्या मनीं
कांहीं नाहीं खळमळ
साऱ्यांसाठीं ओठांवर
आशीर्वादच केवळ

संसाराच्या सरणांत
देह कधींचा घातला
आतां लागलेली आहे
ओढ मातीची मातीला....

# पैठणी

फडताळांत एक गाठोडें आहे त्याच्या तळाशीं अगदी खालीं
जिथें आहेत जुने कपडे, कुंच्या, टोपडीं, शेले, शाली,
त्यांतच आहे घडी करून जपून ठेवलेली एक पैठणी
नारळी पदर, जरी चौकडी, रंग तिचा सुंदर धानी.

माझी आजी लग्नामध्यें ही पैठणी नेसली होती
पडली होती सान्यांच्या पायां हाच पदर धरून हातीं
पैठणीच्या अंवतींभंवतीं दरवळणारा सूक्ष्म वास
ओळखीची....अनोळखीची....जाणीव गूढ आहे त्यास.

धूप-कापूर-उदबत्त्यांतून जळत गेले किती श्रावण
पैठणीनें या जपलें एक तन....एक मन....
खस-हिन्यांत माखलीं बोटें पैठणीला केव्हां पुसलीं
शेवंतीची, चमेलीची आरास पदराआडून हसली.

वर्षांमागून वर्षें गेलीं, संसाराचा सराव झाला
नवा कोरा कडक पोत एक मऊपणा त्याला
पैठणीच्या घडीघडींतून अवघें आयुष्य उलगडत गेलें
अहेवपणीं मरण आलें, आजीचें माझ्या सोनें झालें.

कधीं तरी ही पैठणी मी धरतें उरीं कवळून
मऊ रेशमी स्पर्शामध्यें आजी भेटते मला जवळून
मधलीं वर्षें गळून पडतात; कालपटाचा जुळतो धागा
पैठणीच्या चौकड्यांनों, आजीला माझें कुशल सांगा.

## स्मरणाच्या पार

स्मरणाच्या पार कुठेंसें
वय विचित्र अवघडलेलें
आकार रंग हृदयींचे
चित्रास निळ्या जडलेले.

घनदाट उभें वन भवतीं
त्या सैरावैरा वाटा
उत्फुल्ल पाकळीखालीं
अपरिहार्य सलता काटा

काचेला निर्मळ साध्या
स्वप्नांचा जडता पारा
स्पर्शाच्या ऐलतिराला
अडविता अपाप शहारा

अंगांतिल बाळउबेंत
भरणारा मधुर विखार—
तें अटळ रितेपण पुढलें
दाटतां उरीं अंधार—

स्मरणाच्या पार कुठेंसें
विमनस्क कुणितरी असतें
ती राख हलवितां हातीं
बोटाला ठिणगी डसते.

# वण

खालीं रांगोळी पुसट
तुळशीचें वृंदावन
वाढणाऱ्या काळोखाची
मुकी मुकी दटावण,

आंतबाहेर दाटला
कडूलिंबाचा सुवास
क्षण अनावर झाला
घुसमटूनिया श्वास

....भळभळणारें रक्त
खोल रुतलेली कांच
माझ्या हातांत बांगड्या
होत्या सहा किंवा पाच ?

ओसरल्या रक्तामध्यें
कांपे जुनी आठवण
आहे मनगटावर
एक पुसटसा वण.

# लिंबाच्या पालवींत

लिंबाच्या पालवींत
थरथरतें चंद्रबिंब
डोळ्यांच्या काठाशीं
अडलेला एक थेंब.

चंद्राला जाय तडा
पापणिच्या केसाचा
हृदयाला बांध पडे
घुसमटत्या श्वासाचा

पापणींत जपले तरि
मावळले चंद्र किती
विरघळत्या चांदण्यांत
मनपानें थरथरती.

# मालण

गोरी मालण
उभी राहिली खिडकीपाशीं
कठड्यावर टेकून कोपरें
ओंजळींत मुख घेऊन अपुलें
क्षितिजावरती जडवुन डोळे
बघते आहे वाट कधींची
गणगोताची
माहेरींच्या गणगोताची.

जपते आहे
खोलामधुनी झुळझुळणारा प्रवाह धूसर
आणि तयावर
वर्षत अविरत
मंदपणानें गिरक्या घेऊन
अलगत येउन
स्थिरावणारे कण कसलेसे.

उभीं समोरी डोंगररानें
उंचसखलसा माळ दूरवर
आणिक त्यांतुन वळसे घेऊन
पुढें चालली वाट एकली
मागें आहे घर सासरचें
आहे तिथला उभा पसारा

पुढें चालली वाट लागते सहज उलगडूं
धावत जातें मन तिजसंगें
आणि पोचतें माहेराला
धापा टाकित आईच्या छातीला बिलगुन
गिळूं लागतें कोसळणारें रडें अनावर,

आणिक नंतर बघते मालण
सागरगोटे कांचापाणी
भातुकलीच्या लग्नामधलीं
इवलीं इवलीं राजाराणी
अंगणांतल्या तुळशीपाशीं
रचलेल्या स्वप्नांच्या राशी

सहजच जातो हात अभावित भाळावरती
भाळावरती गालावरती
हौसेनें गोंदून घेतलें
एक साजरें हिरवें स्वस्तिक
होतो त्याचा सक्त पिंजरा
आणि तयांतच गुंतुन पडतें
अडखळणारें पाउल अगतिक
स्मरतें तेंही
चढून जातां पहिल्या रात्रीं माडीवरती
एक एक पायरी जिन्याची
झाली होती अलंघ्य पर्वत.

मागें आहे घर सासरचें
आहे तिथला उभा पसारा
खोल भुयारें आणि तळघरें
माजघरांतिल काळोखाचें मायावीपण
दबलेले हुंदके तयांतुन
पहिल्यावहिल्या स्पर्शामधली मधुर भुलावण
बिंबवणारीं
लगिनचुड्यावर अवघडलेलीं
असंख्य चित्रें

असंख्य चित्रें
नजर लागते पुन्हा न्यहाळू
तनू बाळसेदार गोजिरी
आईच्या हातानें तिजला नेसवलेली
पहिली चुनडी फुलाफुलांची

आणिक नंतर
तीच गांठ कमरेला कचतां
पदरासंगें वेढुन बसलें सर्वस्वाला
अटळ आणखी जुलमी स्त्रीपण

सरकत जाती चित्रें भरभर डोळ्यांपुढुनी
बाल्यामधली यक्षपुरी ती
बघतां बघतां विरून जाते
कोसळतें घर
आणिक उरतो खुंटीवरती नुसता शेला
वाऱ्यावरती झुलत राहते माळ गळ्यांतिल;

अंगावरुनी उतरत जातो
तरुणपणाचा साज साजरा
घडतें कांहीं
केसांमध्यें सहज खोविल्या चाफ्याइतुकें
संसाराचें ओझें होतें हलकें हलकें
मालण हसते जरा स्वतःशीं
हसते आणिक व्याकुळ होते.

ऊन परततें हलक्या पायीं
पसरत येती सांजसावल्या
घरांघरांवर आणि मनावर
आणिक नंतर
एकाकारच होतें सारें
खिन्नपणें चमकती नभांतिल अंधुक तारे.

नसे यायचें तसें कुणीही
कुणि न धाडिला सांगावाही
तरी उभी खिडकीशीं मालण
कठड्यावर टेकून कोपरे
ओंजळींत मुख घेउन अपुलें
बघत राहते वाट सारखी
गणगोताची
माहेरींच्या गणगोताची—

# दूर पायथ्याशीं

दूर पायथ्याशीं खोल खचलेला शब्दशून्य माळ
मावळतीवर तांबडाकेशरी पेटलेला जाळ
क्षण जुळणारी, पुन्हा तुटणारी बगळ्यांची माळ.

लवणामधून वळत चालली लाल पायवाट
तंद्रींतच कांहीं शेताच्या कडेनें वाहणारा पाट
लव्हाळी तुऱ्यांनीं थरथरणारा पाणथळ काठ.

सावल्यांमधून सरकते पुढें निगूढशी सांज
गावाबाहेरच्या देवळामधली झणाणते झांज
जनवसतीची चाहूल देणारे अस्पष्ट आवाज.

हळू हळू हळू वाढतो काळोख माझ्या भवतालीं
काळोखाचा डोह दाटत राहतो पावलांच्या तळीं
मिटाया लागते कुठें तरी आंत पाकळी पाकळी....

## क्षण

एका शुभ्र क्षणामध्यें उजळलीं अंधारलेलीं युगें
आत्मा होउन ज्योत संथ पिवळी तेवावया लागला
जाईचीं बनुनी फुलें उतरल्या हातामध्यें चांदण्या
वारा होउन शीतचंदन करी देहासही लेपन.

होता देहहि राहिला पण कुठें माझा म्हणाया मला ?
तो झाला जळबिंदु एक, विरुनी गेलाच मातीमध्यें
झालें काय कसें मला न कळलें तें स्वप्न कीं वास्तव ?
गेला तो क्षण मावळून, लहरी ती सागराला मिळे.

संध्यारंग गिळूनिया सरकतो काळोख आता पुढें
या निःश्राण तनूंतुनी कुणि बघे साश्चर्य माझ्याकडे.

## चक्र

जोडपावलांखालीं चुरली गवतामधली वाट
गुदमरलेले श्वास : उसासे : आलिंगन घनदाट
सळसळणारी मंद पालवी, झुलणारी तरुशाखा
वातावरणावरी रेखिल्या विस्मृत आणाभाका

आयुष्याच्या वळणावरती आठवणी एकेक
तेवत ठेवुन उरांत आपण विझून गेले कैक
ठसठसणारे स्पर्श राखतां विरघळणारीं गात्रें
पुन्हां उमटती उमटुन मिटती असंख्य असलीं चित्रें

किती उमलले गुलाब आणिक किती पाकळ्या गळल्या
दूर कोठल्या आभाळांतुन किति घनमाला वळल्या
कितिदा भिजली आणिक रुजली मुकी अनामिक माती
क्षण अंकुरती, फुलती, सुकती, युगें पलटुनी जाती.

द्रुत वेगानें गरगरणारें चक्र एक सोनेरी
अवकाशांतुन तुकडे उडवी फेरीमागुन फेरी—

## दिशादिशांतून आले

दिशादिशांतून आले
रंगगर्द तुझे भास
माझें धपापतें ऊर
आणि अपुरता श्वास.

कणांतून कोसळल्या
तुझ्या अनिवार लाटा
मला तळाशीं खेचून
पाणी उसळलें काठा.

तुझें अस्तित्व आग्रही
कसें सर्वस्वें वेटाळी ?
—ओले घामानें तळवे
कांहीं श्वास तुझे भाळीं.

रात्र

झाड घेतात सावल्या ओढून : उन्हें होतात मंद
हळूं हळूं मिटत जातात सारे रंग, आकार
दृष्टी मिटते डोळ्यांत आणि स्पर्श मिटतात अंगीं
गडद गडद होतात दिशा, गडद अंधकार.

खालींवर हेलावणारें दूर दूर ऊर,
गडद गडद काळोखांत गहन सुनेंपण
अज्ञातांतून छातीवर कोसळणारा पूर
अफाट काळ सांधणारा एक एक क्षण—

दिशाहीन हांक यावी तशी रात्र येते,
स्वच्छ सोलीव अटळ सत्य हळूंच पुढें होतें—

## तुझें पाप आणि पुण्य

तुझें पाप आणि पुण्य
तुझें सुख आणि दुःख
एक हजार वर्षांनंतर
यांतलें मागें काय राहील ?

आजची धाप, आजचें काम
आजचें तळपणारें ऊन
आजचा भाळावरचा घाम
तेव्हां कुठें कोण पाहील ?

तेव्हां सुद्धां गवतामधून
अशींच असंख्य फुलें फुलतील
माणसागणिक नाव लेवून
गर्द ताटवे पुन्हां झुलतील.

निळ्याभोर नभाखालीं
लहानमोठ्या लाटा उठतील
लहानमोठे हर्षविषाद
काठावरती पुन्हां फुटतील.

सळसळणाऱ्या धमन्यांमधून
पुन्हां वाहील लाल रक्त
त्यांतल्या थेंबांतच क्वचित
तुझी स्मृती राहील फक्त.

तोंवर सक्त हास्यामागें
आजचा अश्रू राखून ठेव
जाड सोशिक त्वचेमागें
एक जखम झांकून ठेव.

# चारही दिशांनीं

चारही दिशांनीं अंधारून येतें
आभाळ वरचें वर सरकतें
आक्रसत जाते पायांतळीं भुई
आक्रंदतें मन 'नाहीं नाहीं नाहीं !'

अवघे नकार मनीं दाटतात
हातांत धरले हात सुटतात
पाहतांना कधीं मागें परतून
पुसटही तेथें उरते ना खूण

उरलें आयुष्य भुयारासारखें
दूर दूर दूर जातें काळोखत
आकृतिविहीन दाटती सावल्या
मीही ज्यांत मला नाहीं ओळखत

विलग क्षणांची संगत जुळेना
काय कशासाठीं कांहींच कळेना
तुटलेली जीभ, शिवलेले ओठ,
गळ्याशीं दाटतो कडू कडू घोट.

खालींवर फक्त हेलावतें ऊर
उरांत भरतो परकासा सूर
स्वप्नांमध्यें जसा जीव कासावीस
नकळत गेला बुडूनियां दीस.

## कांहीं

वेलींत फूल मिटतांना
दूरच्या निळ्या रेषेशीं
घनगर्द मेघ उठतांना
मज चाहुल देतें....कांहीं

पाऊस फिका पडतांना
निःशब्द हिरवळीवरतीं
पाकळी मुकी झडतांना
मज विकल करी तें....कांहीं

पाण्यांत किरण विरतांना
काळोख्या छायांमधुनी
काळोख अधिक भरतांना
मज घेरित येतें....कांहीं

वाऱ्यास धुकें शिवतांना
भिजलेल्या गालांवरतीं
पापणी श्रांत लवतांना
मी विसरूं बघतें....कांहीं

## निळें नितळ आभाळ

निळें नितळ आभाळ
छाया मनाच्या तळ्यांत
सूर गुंतले....मिटले....
लाल कमलकळ्यांत

एक पाऊल तळ्यांत....
एक पाऊल मळ्यांत....
एका जुन्या आठवाचा
हात हट्टानें गळ्यांत....

# खूप प्रयासानें आवरावा हुंदका

खूप प्रयासाने आवरावा हुंदका
तसा गडद शेंदरी प्रकाश
जमत आलेल्या सावल्यांमधून
दुपारउन्हाचे नुसते भास

खोल कुठें झिणझिणणारी
उगाच कांपते एकाकी तार
माझ्यांतलें कोणी होऊन दूर
स्फुंदत राहातें क्षितिजापार.

# चांदण्यांत गोंधळलेलें पाणी

चांदण्यांत गोंधळलेलें पाणी
आणि पावलांशीं खळखळत वाहणारीं गाणीं
शेकडों चिमुकले चंद्र
लाटालाटांतून लवणारे
वारे वाहणारे लिंबावरून

आभाळांतून
संथपणें सरकणारा एखादा ढग
हरवलेलें दूरस्थ जग
ल्हाळी वास, आसपास

आणि क्षणोक्षणीं विरघळत चाललेल्या जाणिवेचे
नुसते नुसते भास.

## दान

किती युगांच्यानंतर आज
निवळलेली भोवती हवा
स्वच्छ धुतल्या काचेआडून
लखलखीत लागला दिवा

गाळीत पाणी खोल मनांत
मंद पिवळा उजेड भरे
सुखभराने इवलेपणीं
जीव मासोळी होऊन फिरे

झरे-पाझर कुठून कसे
रितेपणाला येतात भरूं?
दयावंत हें दान घेतांना
नको कसला अर्थ विचारूं.

# भेट

निळींगार फुलें चार
घेवड्याच्या वेलावर
ऊन्ह खेळवीत राहे
गोड सुवासलहर

अर्धें भोगीत सावली
अर्धें उन्हावलें अंग
तंद्राजड डोळ्यांमध्यें
फिके स्वप्नांतले रंग

झुकलेला घोस एक
आलीं वाऱ्यालाच फुलें
भास तयाच्या स्पर्शाचा
माझ्या भाळावर हाले

मिळे सावली उन्हाला
तेथे थरारते रेषा
स्वप्नजागृतीची सीमा
तिची शब्दातीत भाषा

देतां घेतांना कितीक
सारें मिटलें अंतर
माझी मला घडे भेट
लक्ष युगांच्या नंतर.

## सारें संपलें तांडव

सारें संपलें तांडव
मौन उरलें गहन
श्वास ओझरता तोही
आतां होईना सहन !

झाड झोडपलें होतें
उभ्या आडव्या वाऱ्यांनीं
प्राण कासावीस झाला
हुंदक्यांनीं—शहाऱ्यांनीं

क्षण वाटलें निश्चित
सारें सरलें सरलें
कसें विध्वंसांतूनही
मूळ चिवट उरलें ?

कसें जळाचें लाघव ?
कसा भुईचा ओलावा ?
सूक्ष्म नाजुक तंतूंनीं
असा पहाड पेलावा !

ओसरल्या वादळाचा
पुन्हां कशाला आठव ?
पातीवरती मनाच्या
दंव जपून साठव.

## उच्चारलेले सारे शब्द

उच्चारलेले सारे शब्द, दिलेलीं आश्वासनें,
भरभरून आलेलें ऊर
आणि डोळ्यांत दाटलेलें पाणी—

अवकाशांतून कोरलेले सुंदर आकार ठिसूळ ठरले
आणि विरले श्वासदेखील.
दोघांतलें अंतर आज किती वाढलें आहे.

पण आज मी बघतें आहे
अफाट काळाच्या संदर्भांत अर्थही नव्हता ज्याला फारसा
तें सारें रुजून आलें आहे व्यक्तित्वांतून
पावसाळ्यांत उगवणारी अकारण हिरवळ होऊन.

# माझ्यापासून कितीदां

माझ्यापासून कितीदां मीच दूर दूर गेलें
पायवाटा, राजरस्ते धुंडाळून पुन्हां आलें

जिथें पाहूं गेलें तिथें होत्या अडवित्या भिंती
चक्रव्यूह तेढामेढा पोटीं उपजवी भीती !

ठिबकतें जागोजाग गूढ काळोखाचें पाणी
आणि मागून सारखें पाय ओढणारें कुणी

तेच प्रचंड पिंजरे उभ्याआडव्या गजांचे—
तेच अटळ दिवस दैवीं लिहिल्या सजांचे—

कैद अनंत जन्मांची वाढे घटका घटका
काय माझ्यांतून मला नाहीं कधींच सुटका ?

# आयुष्यांत

आयुष्यांत उलटून बघावे लागतात चेहरे
अनेकदा इतरांचे आणि कधीं आपलेही
शब्दांचा खरा आशय कळण्यासाठीं
अर्धे जगणें जगूनही पुरें पडत नाहीं.

दिवसरात्र बनते मग एक सलग पोकळी
किंवा एक दुर्बीण—मात्र उलट्या भिंगाची
जी डोळ्यांना लावून बघतांना
साधीं साधीं माणसेंही दिसतात रंगारंगाचीं

अशा वेळीं खरें खोटें एकांत एक मिसळतांना
जीवनद्रवानें पेला भरून खालींवर हिसळतांना
डोळे भाजणारें रसायन असें चमकून जातें कांहीं
तुझ्यापुरतें तेंच सत्य....दुसरें कांहींसुद्धां नाहीं.

## चेहरा

हा चेहरा माझा नाहीं, नाहींत माझे हे भाव-आविर्भाव
हा परंपरेनें मला लाभलेला : जसा माझा देहस्वभाव
नसानसांतून पसरलेलीं परंपरेचीं पाळेंमुळें
खोल भुयारांतला प्रवाह रक्तामधून गूढ सळसळे.

डोळ्यांमधून डोकावतें....भुतासारखें हसतें कोण?
जन्ममृत्यूच्या पडद्याआडून क्षणैक मला दिसतें कोण?
या वेदना, संवेदना, हीं स्फुरणें, हे हर्षविषाद,
हा कुणाचा दारुण शाप? हा कुणाचा वरप्रसाद?

चेहरा जून होतां होतां एके दिवशीं गळून पडेल
जुनाट वंशवृक्षाचें आणखी एक पान झडेल....

# निरर्थाच्या क्षणीं

वारे थकून विसावलेले आभाळाच्या वक्षावर
घरटें धरतें वत्सल छाया शेवटच्या पक्ष्यावर
सुगंधाचे सारे पीळ सैल होऊन सुटलेले
प्रत्येक फुलाचें स्वतंत्र विश्व आपल्यांतच मिटलेलें.

वळसा घेऊन स्वतःपाशीं पुन्हां येते प्रत्येक वाट
काठापासून परतलेली आंत आंत घुसते लाट
दूर कोठें चंद्र, तारे, आभाळ दूर त्याहीवरतें
फक्त पुसट चंद्रबिंब ओल्या रेतीवर उरतें.

सुरामधून उलगडत सूर पुन्हां विरून जातो
शब्द शब्द आपला अर्थ पुन्हां आंत ओढून घेतो
गालावरची ओली खूण अदृश्याचा हात पुसतो
अशा निरर्थाच्या क्षणीं आपण सुद्धां आपले नसतों.

# धून

त्वचेसारखें एकाकीपण जन्मापासून जिवास जडलें
काळोखाचे चिवट धागे प्राणांच्याही खोल भिडले
रस्त्यावर अफाट गर्दी तरी ज्याचा तो एकटा
त्याच्या पावलांपासून फुटतील त्याच फक्त त्याच्या वाटा.

झाकल्या पापणीमागें उभें ज्याचें त्याचें खाजगी जग
खाजगी अगदीं त्याचें सुख, त्याचें दुःख, त्याची तगमग....
कधीं मधीं आधाराला पुरतो दगड, पुरते भिंत
पूरपाण्यासारखें पुन्हा एकाकीपण वेढतें संथ...

अवतींभवतीं पसरू बघतों अंतर्वर्ती केंद्रामधून
घणाघातासारखी आंत घुमत असते आत्मधून.

# निर्वात

गाढ स्नेह असला तरी कधी येतात असे क्षण
दोघांच्याही मनांमध्यें दाटून येतें एकटेपण !
व्यक्तित्वाचा मूढ मुखवटा त्याच्यामागे विराट पोकळी
गर्द रानें : एकाकी वाटा : चांदण्यांत न्हालेलीं तळीं :

तोंड फिरवून बसतें आभाळ, बंद होतात दिशा दाही
एकांमेकांत शिरायला रस्ताच मुळीं सापडत नाहीं !
शब्द सारे होतात मुके, उग्र नकारांकित मन—
ओळखीच्या पोटांतली ही अनोळख किती विलक्षण!

आत्म्यांच्या अलौकिक जवळिकीलाही सीमा असतात
कधीं नुसते देहावरचेच खाच, खड्डे, डाग दिसतात;
अशा वेळीं करशील काय ? हातचा हातच सोडून देशील ?
अभिमानानें ताठ असशील कीं अशरणतेनें रडशील ?

उंच कडा मागें उभा....पुढें अथांग दरी भयाण....
स्नेहशून्य निर्वातांत सावरशील ? झोकशील प्राण ?

## सहजखूण

सहज फुलूं द्यावें फूल, सहज दरवळावा वास
अधिक कांहीं मिळवण्याचा करूं नये अट्टाहास
सुवास, पाकळ्या, पराग, देठ—फूल इतकीच देतें ग्वाही
अलग अलग करूं जातां हातीं कांहींच उरत नाहीं.

दोन पावलांपुरतें जग तेंच अखेर असतें खरें
हिरवीगार हिरवळ तीच, त्याच्यापुढें काय उरे?
पुढें असतें वाळवंट फक्त, करडें, रेताड आणि भयाण
निर्वात पोकळीमध्यें अशा गुदमरून जातात प्राण!

फूल खरें असेल तर सुवास तोही आहे खरा
वाळूइतकाच खरा आहे वाळूमधला खोल झरा.
थेंबामध्यें समुद्राची जर पटते सहजखूण—
सुंदराचा धागा धागा कशासाठीं घ्यावा उकलून?

मुखवटाही असेल, असो....मागलें कांहींच नये दिसूं
साधे शब्द पुरेत तेच, एक साधें सोपें हसूं....

## समंजस

दुःख समंजस माझें
नाहीं फिरविली द्वाही
कधीं आलें आणि गेलें
मला कळलेंही नाहीं

मला कळलेंही नाहीं
उरे पुसटशी खूण
....फक्त फिकट चांदणें
....फक्त मंदावलें ऊन.

## त्याला जपण्यासाठिंच

शतधा झाला देह तरीही
अभंग राहो आंतिल 'तो'
त्याला जपण्यासाठिंच माझा
जीव असा हळवा होतो.

तसें इथें तर कुणीच नाहीं
अक्षय अव्यय ल्यालेलें
सहा ऋतूंचे सहा सोहळे
गगनाचेही झालेले !

जळधारेच्या अखंडतेंतहि
थेंब आजचा उद्यां नसे
ठाउक सारें—तरी झोंबतें
चिरंतनाचें दिव्य पिसें !

कालची न मी आज, आजची —
पुन्हां उद्यांला मी नाहीं
अंतर्यामीं 'त्या'ला देतें
तरिही माझी मी ग्वाही !

# तुझे शब्द माझे शब्द

तुझे शब्द माझे शब्द
दूर भांबावून उभे
मध्यें अनामिक दऱ्या
वाहणाऱ्या काळोखाच्या
ऐलतीरीं पैलतीरीं
सूर गुंफिती बासऱ्या

तुझे शब्द माझे शब्द
विस्तारत विस्तारत
होत जातात धूसर
मुक्या अवकाशामध्यें
मिळताही मिळेचना
त्यांचा मिळेचना स्वर.

तुझे शब्द माझे शब्द
अनोळखीपण त्यांचें
कसें कोण सांधणार?
साचलेल्या अभावाच्या
निःस्तब्ध या डोहावर
पूल कोण बांधणार?

# एकाकी

'तुझा' आणि 'तुझ्यासाठी'
शब्द सारे खोटे,
खरीं फक्त क्वचित कधीं
बिलगणारीं बोटें.

बिलगणारीं बोटें तींही
बिलगून सुद्धां दूर
खोल खोल भुयारांत
कण्हणारे सूर.

दूरदूरच्या ओसाडींत
भटकणारे पाय,
त्वचेमागील एकाकीपण
कधीं सरतें काय ?

## शब्दामागें उभा अर्थ

शब्दामागें उभा अर्थ
अर्थामागें उभें मन
मनाच्याही पैलपार
बोले कुणीसें गहन

उभ्या आभाळापर्यंत
तरी फोडाव्यात राशी
रक्तबंबाळ होऊन
तरी भिडावें तयाशीं.

## शब्द म्हणजे

शब्द म्हणजे असतात केवळ बेटें
पाण्यानें वेढलेलीं, एकमेकांपासून तुटलेलीं
सांभाळीत उरावर निबिड अरण्यें, हिंस्र श्वापदें
दूरचें क्षितिज न्याहाळीत आपल्यांतच मिटलेलीं.

शब्द म्हणजे केवळ तारा, निर्जीव वीजवाहिन्या—
क्षणकाळ पेटणाऱ्या, एरव्हीं विझलेल्या,
पेटतेपणाची आतुर प्रतीक्षा करीत
मनांतल्या धुळीमध्यें घनघोर निजलेल्या.

शब्दांनीच परस्परांना भिडूं बघतों आपण
लढूं बघतों आपण,
शब्दांना शब्द भेटतीलच असें नाहीं
शब्दांनी शब्द पेटतीलच असें नाहीं

## ढग येतात

पुरून ठेवले आहेत किती शब्द मातीखालीं
आभाळांतून सरकतात फक्त वांझोटे ढग,
दूर कुठें तरी असेलही घनदाट बरसात
असेलही सरसरून उठत एक हिरवें गर्द जग.

कालामध्यें सामावलेला कालातीत अखंड अनुभव
एक धावतें वादळ : एक अवरुद्ध गती
अस्फुट ओले थेंब : पापण्यांवरचे तरल भास
गालावरून फिरणारें पीस : किती, किती आणि किती—

डोळ्यांआड जपून धरीत अवकाशामध्यें दिसलेलें
हिरवें चमकदार पातें अंग मुडपून बसलेलें
बीजामधले अंकुर तगमगतात प्रकाशासाठीं
शब्द पडून आहेत खोल भूमिगत प्रवाहाकाठीं.

ढग येतात....ढग जातात....कधींकाळीं घेतला वसा....
पुरून ठेवलेल्या शब्दांचा कणकण होतो भुसा.

## प्रत्येक सुकलेल्या पाकळींत

प्रत्येक सुकलेल्या पाकळींत
अंतर्भूत असते सुगंधाची गाथा
उमलण्याची व्यथा;

वाऱ्यावर लिहिले गेलेले उच्छ्वास
खोल कुठें क्वचित फळाची आस;

उन्हाशीं केलेले सोनेरी संकेत
डोलतांना मजेंत;

त्याच्याही मागें वेदना निरुपाय
रुजलेला कोठें फुलपाखराचा पाय
काट्यांची सल, पाण्याची ओल;

प्रत्येक सुकलेल्या पाकळींत
असतात दडलेले अनंत संभव
अधिक उणे
स्थलकालाचा दुवा जोडणारे सलगपणें

जसा प्रत्येक शब्द उमटलेला, न उमटलेला
अथवा जन्मतांना विझलेला ओठीं
ज्याच्या पुढें आणि पाठीं—
उभें असतें एकेक विश्व.

## पडदे

मागें सारुन आज सात पडदे डोकावतें खोल मी
कोठें चांचपतात काय नकळे बोटें खुळीं आंधळीं !

ओल्या आठवणी, अनावर हसें, दूरस्थ दुःखें तशीं
कोठें विस्मित खिन्न मूढ पुतळे, कोठें फुलें वाळलीं
कोठें विव्हल चांदणें डहुळतें रस्ता निघे एकटा
चित्रें भंगुनिया कितीक पडलीं जाऊन वेडे तडे.

दारें लावुन सर्व येथ मजला केलें कुणीं बंद ? कां ?
नाहीं मी रडलें, कुठून मग हा आला बरें हुंदका ?

## रहस्य

विश्वांतील रहस्य सुंदर उरे विश्वासही व्यापुनी
डोळे हे फसवे जिथें जळ तिथें भूमी तयांना दिसे
शब्दांनाहि अनेक अर्थ, नकळे त्यांचा खरा आशय
स्पर्शातीतच जें खरोखर कसें लाभेल तें स्पर्शनें?

मी पुष्पें हृदयीं धरून बघतें गंधास कोंडावया
मातीच्या पणतींत भंगुर बघें ठेवावया सूर्य मी
वाटे ओंजळही भरून करतां येई रिता सागर
डोळ्यांनीं क्षितिजास प्राशिन अशी ऊर्मी कधीं ये मनीं.

माझा देह परंतु मर्त्य असती पंचेंद्रियें क्षीण हीं
जाते एक पळामध्यें सुकुनिया ही जीविताची लता
टाहो फोडिति प्राण सूर न परी ओठांमधूनी फुटे
मातीचें घर : ज्योत त्यांत भडके : तीही विझे शेवटीं.

कैचें जीवन हें, इथें जर अम्ही मृत्यूच हा श्वासितों
जातां स्पर्श करूं फुलास उरती हातीं सुक्या पाकळ्या !

कोणाचें मन हें इथें विखरुनी रंगांतुनी सांडलें ?
मातींतून रुजून कोण फुललें उन्मुक्त पुष्पांसवें ?
कोणाचे मृदु सांध्यभाव हसरे मेघांत आकारती ?
वाऱ्यांतून भरीत शीळ फिरतें हें कोण वेड्यापरी ?

वृक्षांच्याहि मुखावरी स्मित दिसे गंभीर आश्वासक
पानांची कुजबूज मंद हळवी विश्रब्ध वाटे किती !
श्वासांचे इवले तरंग उठले, पाण्यावरी कीं मनीं ?
येतो ऊर कसा भरून ? नयनीं कां दाटती आसवें ?

आभाळीं घननीळ तोच विलसे मातींतुनी जो रुजे
अंतर्बाह्य भरून पूर्ण उरली त्याची कृपा कोवळी
कांहीं एक नवीन खूण पटते माझीच आतां मला
मी माझेंपण विस्मरून भरतें साऱ्यांमध्यें आज या—

हा माझाच मला बहार दिसतो विश्वांत सामावला
आलें लेवुन रंग तेच हळवे कित्येक जन्मांतले.

# तिरपा क्षण

पाठीशीं भरदार घेऊन कडा खालीं दरी कोसळे
ओलेता हिरवेपणा ठिबकला छायेंत पानांतला
बुंधे राकट उग्र आणि वलयें वेलींतलीं लाडकीं
डोळ्यांच्या बुबुळांत आतुरपणीं चित्रें किती बिंबलीं.

सारें सुंदर अप्रमाण भंवतीं गूढामध्यें झांकलें
झाला व्याकुळ जीव स्पर्शुन तया अस्पष्ट कांहीं तरी
तों हेलावुन भोवताल फुटलें काचेपरी नाजुक
आली लाट विराट एक कुठुनी वेढून घ्याया मला.

गेलें अंग भुईमध्यें मिसळुनी मातींत माती जशी
गेले श्वासहि दूर दूर, उतरे आभाळ डोळ्यांमध्यें
पक्ष्यांची किलबील मंद विरली, निःस्तब्ध झाले क्षण
मीं जन्मांमधुनी अनंत फिरलें माझेपणा सोडुनी

....झालेला क्षण तो कलून तिरपा....ती थांबलेली गती
गेलेलीं स्थलकालशीं मिळुनिया तें स्वप्न, ती जागृती....

## भूतांतूनच

भूतांतूनच वर्तमान उमले तेंही पुन्हां मावळे
एकामागुन एक लोटुन अशीं संवत्सरें चाललीं
गेलें बाल्य दुरी, धुक्यांत दडलें, अस्पष्ट झालें अतां;
माझेंही मज ना कळे पडतसे देहीं कसा पालट.

पायांखालिल वाटही बदलते जाते मिटोनी जुनी
आतां हे नवखेच वृक्ष दिसती बाजूंस दोन्ही उभे
कोठें मंदपणें कुतूहल मनीं केव्हांतरी चाळवे
जातें तेंहि विरून आणि उरते निःस्तब्धता, मूकता

केव्हां बंद करून जीव उठतो सारेंच नाकारित
"देऊं सोडुन वाट आणिक घुसूं या आडरानामध्यें?"
माझी मी मजलाच प्रश्न करतें होऊन कासाविस
भीतीनें वळती फिरून, पडतीं वाटेवरी पाउलें.

आतां एकच सत्य: तेंच उरलें जाणीव ही व्यापुनी
भूमी आणिक पाय आणि गति ही नाहीं जिला शेवट.

२०८८
काव्य

## दुभंग

मी रक्तांतुन सूर्य कां रुजविला ? कां प्राशिलें चांदणें
गात्रांतून ? नसांतुनी रुजविल्या नक्षत्रवेलीहि कां ?
मर्मी झेलुन वीज पार फसलें, उद्ध्वस्त झालें पुरी
गेलें झाड उभें जळून, धुमसे राखेंतुनी पालवी.

आहें मी दुबळी अतीव जर हें माहीत होतें मला
मोहानें भलत्या कठोर इतुकें कां दान मी याचिलें ?
दाता निर्दय तूं असीम तव हें औदार्य आहे तरी
माझें वस्त्र विशीर्ण जीर्ण अपुरें भिक्षा तुझी घ्यावया.

आतां जाणिव स्पर्शमूढ, उसळे काळोख डोळ्यांपुढें
झालें रक्तच बेइमान मजशीं, संवेदना गोठल्या.
भिंती कोसळल्या कशा धडधडा नाहीं निवारा शिरीं
ये फेसाळत पूरपाणि भवतीं घ्याया गिळोनी मला.

नाहीं मी इथली, नसेंच तिथली, आधार सारा सुटे
हें घेऊन दुभंगलेपण उरीं जाऊं अतां मी कुठें ?

# सायुज्य

वस्तूंच्या अधरांवरून पुसते जेव्हां जुनी ओळख
झाडांचा हिरवेपणा हरवतो, आभाळ जातें दुरी
पायांखालुन भूमिही सरकते होती दिशा पारख्या
कालातीत विषण्णतेंत झरतो एकेक काळा क्षण.

माझाही गळुनी पडे मुखवटा, अस्तित्वही लोपतें
येतें दाटुनिया रितेपण मनीं ओसाड वाळूपरी
साऱ्या सुंदरतेस विकृति जडे होतें स्मिताचें रडूं
ज्याला स्पर्श करीत मी फुटुनिया उद्ध्वस्त तें होतसे.

मी माझ्यांतच खोल खोल बुडुनी तेव्हां तुला शोधतें
झंझावात बनून वेढित मला येतोस तूं निष्ठुरा
घेसी तीक्ष्ण विजेपरी कवळुनी या मूढ गात्रांप्रती
होसी ओघ अनाद्यनंत मजला खेचीत न्याया पुढें.

घे खग्रास मला गिळून असली तूझी कठोरा दया
या प्राणांतिक मीलनांतच परी सायुज्य लाभे प्रिया.

# आलों चालुन प्रांत

आलों चालुन प्रांत दूरवर हा : सारें इथें वेगळें
अंगांगांतुन खोल शीण भरला, लागे जिवा धापही
पूर्वीचा अवघा प्रदेश हरपे, कोठून आलों कुठें ?
चालावें तितुकी पुढेंच सरके रेषा नभाची निळी.

होतें आंखिव विश्व बाळपणचें, आभाळ होतें खुजें,
होता बाहिर-आंत एक भरला आनंद भोळा खुळा,
होता एकच रंग गार हिरवा, होतीं फुलें, पाकळ्या,
होते स्निग्ध पराग कोमलपणें देहावरी वर्षत.

हातीं हात धरून पाउल पुढें कोणी कधीं टाकलें ?
गाणीं गात सुरेल आणि सुटलों कैसे कुठें धावत ?
—झाला सूर्य कधीं कठोर नकळे, वाऱ्यास अग्नी फुटे
आतां एकच रंग रुक्ष करडा मागें, पुढें, भोवतीं.

रेताडें पिवळीं बघून दुखते डोळ्यांतली बाहुली
जेथें ऊन अफाट काय पुरते तेथें तुझी साउली ?

## काळोखपाणी

आलीं सोनउन्हें मिटूं : सरकती आता पुढें सावल्या
गेलेलें दिवसास दूर परते वारें मऊ शीतळ
सांजेच्या क्षितिजांतुनी विखुरली गोधूळ खालीं बसे
किंवा हा दिन श्रांत टेकित हळूं गालावरी पापणी !

आभाळांतिल रंग गर्द विरले काळोखपाण्यांतुनी
येते लाट पुढें गिळीत अवघें एकाच घोटामध्यें
साराही अवकाश एकवटला खालीं वरी भोवतीं
निःशब्दावर रेखिते झुळुक ही अज्ञात कांहीं लिपी.

विश्वें दूर अफाट नांदति कुठें कक्षेंत आपापल्या
एकाकी पथ आक्रमीत फिरती तारे तसे दूरचे
काळेंभोर अरण्य हिंस्र : गवती कोठें किडा श्वास घे
नांदे अद्‌भुतरम्य एक दुनिया पायांतळीं सागरीं.

शून्याला परिमाण देत चमके मित्री वरी चांदणी
काळोखांतच श्वास हा घुसमटे, काळोख दाटे मनीं.

# आरसा

अस्तित्वावरुनी ऋतू कितितरी जातात हे वाहुनी
देहाचीहि त्वचा जुनी गळुनिया येते नवी पालवी
या साऱ्या बदलांतुनी तरि कसा गाभा उरे तोच तो?
प्राणांतून झरे अनावर कशी ही धून? ही पावरी?

येतें लेवुन रंग बाळपणिंचें आभाळ भोळें खुळें
सांजेला क्षितिजावरी उमटती अंगाइगीतें पुन्हां
जेव्हां वात दिव्यामध्यें उजळते, वाऱ्यासवें नाचते
होतें कंपित ऊर आणि भरती डोळ्यांतुनी आसवें.

काळाचा पट एक एक सरके, खालीं बसे धूळही
काळोखांतुन हालती कवडसे, हेलावती सावल्या
सारें दृश्य अनोळखी तरि पटे कांहीं जुनी ओळख
कांहीं मंदपणें मनीं झिरपतें, काळीज ओलावतें

जातें छेडुन कोण तार हृदयीं? हा सूर येतो कसा?
भूताची भलती भुलावण करी तो कोणता आरसा?

# एकोऽहं बहुस्यां

प्रकाश परावर्तित करणाऱ्या काचा, बदलणाऱ्या प्रतिक्षणीं
विचित्र आरसेमहालांत या कोंडलें मला कधीं ? कुणी ?
खालीं, वर, इकडे, तिकडे, कसें, किती, काय पाहूं ?
इथून पळ काढूं किंवा खिळल्यासारखी स्तब्ध राहूं ?

मजपासून दूर जाणारीं : उमटणारीं : मिटणारीं :
कांहीं सलग जुळणारीं : कांहीं तडकून फुटणारीं :
जिकडे पाहीन तिकडे मला माझीं प्रतिबिंबें दिसतात
माझीं अनंत रूपें, विरूपें, अपरूपेंही त्यांत असतात.

एकांत एक खोलवर किती बिंबें बिंबलेलीं
माझी बिंबरूप छाया गती हरवून थांबलेली,
विखुरलेले अगणित तुकडे, तुकड्यांतही मीच असतें
कुठें पिळवटून आक्रसतें, कुठें रडतें, कुठें हसतें.

विराट आणि व्यथापूर्ण विस्मयावह व्यंगाकार....
'एकोऽहं बहुस्यां' चा सनातन साक्षात्कार.

## देणें

किती जन्मजन्मांतुनी हिंडतांना किती साहिल्या अंतरंगीं कळा
युगांचेंच देणें सदा देत आहे तरीही तपस्या न आली फळा
जरी रक्त रक्ताप्रती दाद देई परीघांत जो तो स्वतःच्या फिरे
त्वचामीलनें मात्र होती क्षणाचीं उरांतील आत्मा अभागी उरे

किती पल्वलांतून वेंचून पुष्पें तयांचे गळां हार मी घातले
कलंकामध्यें हात माखून अंतीं उरे फक्त निर्माल्य भोळें खुळें.
अनंतांतली साद प्राणांस येतां उडे जीव्र झेंपावुनी अंबरीं
खुडूनी जरी श्वास द्यावे स्वतःचे तरी मूक हातांतली पाखरी,

स्वतःचा व्यथाभार तोलीत माथां अविश्रांत जीवा कुणी ताणणें
इथें सूर प्रत्येक शोधी दुज्याला तरी ना कुणाला कुणी जाणणें
स्फुरूं पाहते जों मनालागिं वाचा तुटे जीभ बंदिस्त ओठांतली
तरंगांतलें बिंब जातें फुटूनी जळींची जळीं लोपते सावली.

जरी भोग हा भोगणेंही चुकेना व्यथेचीच होवो कथा सुंदर
जिव्हाळींतल्या रक्तधारेस देवा असा लाभुं द्या अमृताचा वर!

## बुडणारें कांहीं

घनदाट निबिड मन
स्वच्छ कोवळी तनू
आंतल्या ज्योतिनें
पाजळला अणु अणू

स्मित अधरावरती
पदर गूढ जाणता
हृदयाशीं जपतो
आशय तो कोणता ?

घटकेंत वाटतें
इवली ही बाहुली
पापण्यांआड पण
शतकांच्या चाहुली

घनदाट निबिड मन
अथांग जळ सावळें
बुडणारें कांहीं
आंत संथ मावळे.

# हिरव्यागार ताटव्यांतून

हिरव्यागार ताटव्यांतून हिंडणारी एक मुलगी,
माना उंचावून बघणारे प्रश्नार्थक गुलाब,
दूरांतून येणारे समुत्सुक स्वर
लडिवाळ आवाहनाचे,
आणि क्षितिजापर्यंत अस्पष्ट होत जाणारा
जाणिवेपलिकडचा एक प्रदेश;

वाहतो आहे वारा हलकेच
वात्सल्यानें तिचे गाल स्पर्शीत, कुरवाळीत,
तिचे डोळे
डोळ्यांपलिकडचें चित्र बिंबवणारे.

हेलावत हेलावत स्तब्ध होतात ताटवे
हलके हलके गळतात गुलाबपाकळ्या
धूसर होत जातात, विरतात स्वर,
आणि पिवळें पडत जातें गवत....

# एक लहान मूल

ढसढसून रडणारें एक लहान मूल; असहाय, अगतिक
मला त्याच्या रडण्याचें कारण माहीत नाहीं,
त्याचा खाऊ कुणीं पळवला ? त्याचें खेळणें हरवलें ?
कीं....धस्स होतें छातींत माझ्या—हरवली त्याची आई ?

रडून रडून सुजलेले डोळे, गालांवरचे पोरके ओघळ,
हुंदक्यांनीं गदगदणारें इवलेसें कृश ऊर;
मुद्रेवर कोरलेला अपार हरवलेपणा गुदमरवणारा
या क्षणीं तें गेलें आहे साऱ्यांपासून किती दूर ?

एक लहान मूल प्रथमच होणारें सुजाण,
बाळओठांनीं चाखलेली दु:खाची पहिली चव,
निर्मळ जळांत मिसळलेला पहिला थेंब जहराचा
प्रथमच होणारा प्रौढपणाचा अकस्मात संभव.

इथून पुढें त्याचे डोळे अधिकच खोल होतील
आणि त्याचे कोवळे हात चटक्यांना सरावतील....

## पन्नाशी उलटूनही

पन्नाशी उलटूनही अजून ती पोरच राहिली आहे
जिला घर वाटतें घरकूल आणि संसार भातुकली
तशी खूपच लांब वाट चालून आली आहे
तरी तिचीं लहानगीं पावलें अजून नाहीं थकलीं

संकटें वाटतात तिला अजून गोष्टींतलेच राक्षस
ज्यांच्याशीं ती गवताच्या तलवारीनें मुकाबला करते
भाळावरचा घाम पुशीत हसत हसत घालते घाव
कधीं जिंकते, कधीं तलवार मोडल्यामुळें हरते.

कठिण प्रश्नही स्वतःपुरते केले तिनें सोपे
गुंतागुंत साध्या सरळ चौकटींतच बसवली
चांदण्यांत सारेंच नितळ होऊन जावें
तशी तिनें आपल्या स्मितांत प्रतिकूलताही हसवली !

कधीं कधीं मात्र अगदीं जाते हताश होऊन
मुठींतलें प्राजक्तफूल कोमेजावें तशी दिसते
पुन्हां उठते खूप हसते तोच तिचा विरंगुळा
किंवा गाणें गात बसते जरी गोड नाहीं गळा.

परवा किती दिवसांनीं भेटली मला अचानक
नेहमींसारखी बोलली जीव भरून अनावर उत्सुक
मला मात्र प्रथमच दिसले झपाट्यानें पिकणारे केस
प्रथमच जाणवला तीव्रतेनें प्रवाहावरचा पोकळ फेस.

## ती

रस्त्यावरून गर्दीसंगें वाहतांना : ती एकटी
एकांतांत आरशामध्यें पाहतांना : ती एकटी
ती एकटी : पांढऱ्याशुभ्र ढगासह उडतांना
ती एकटी : काळ्याभोर डोहामध्यें बुडतांना

मुख उमलत्या कमळासारखें शांत तृप्त स्वयंमग्न
झुळझुळणारा सांजवारा तसें तिचें संथ श्वसन
आंतल्याआंत खूप कांहीं घडत असतें....मोडत असतें....
नितळ निर्मळ डोळ्यांनीं ती फक्त स्वच्छ हसते !

माणसें भोंवती गोळा होतात, कोलाहल सर्वकाल
तिचें उजवें पाऊल तेव्हां अलगद देत असतें ताल
लाट मोडल्याविना जसें पाण्यामधून यावें ऊन....
सुखदुःख दोहोंच्याही पैलपार तिचें मन !

स्वतःमध्यें खोल खोल अशीच ती रुजत जाते
हिरवागार सूर होऊन अवघेपणीं प्रकट होते.

## अतर्क्य

ढगाळलेल्या आभाळाचें होतें तिचें मन
मुखावरतीं तिच्या सतत सावट विलक्षण
डोक्यावरून पदर घट्ट : दांतीं त्याचा शेव
दोन मोजक्या शब्दांचीच कायम देवघेव.

एकदा जिना उतरतांना तिनें पाहिलें वळून
काय पाहिलें मला कधींच आलें नाहीं कळून !
दिवेलागणीला एकदा धावत आली कुठून
काळोखांत गडप झाली, रडली फुटून फुटून !

आणि मग चार दिवस भकास भकास झाली
अवंढा गिळीत मुकाट राहिली डोळे वळवून खालीं
फट्ट कपाळाच्या मागें सारें कांहीं दडवून
उजाड डोळ्यांमध्यें तिनें चंद्र टाकला बुडवून.

स्वतःशीच कांहींबाहीं आतां बोलत असते
कधीं दूरच्या ढगावर नजर लावून बसते;
दारावरून प्रेत गेलें तिला आलें हसूं;
घसाघसा पदरानेंच गाल लागली पुसूं.

## अपरिचित

उजवीकडे अनोळखी देऊळ, डावीकडे अपरिचित रस्ता
समोर हेलकावणारा अथांग जलाशय
मावळत्या किरणांत चमचमणारें पाणी
त्याच्या पलिकडे अस्तोन्मुख सूर्य टेकलेला क्षितिजाशी
आम्ही दोघी उभ्या अलिकडल्या काठाशी.

कांही क्षणांपुरत्या आम्ही खूप खूप जवळ
प्रत्येकीचें खाजगी जग मागें लांब दूर
ती बोलते आहे मुक्त होऊन, भरून भरून ऊर....
तिच्या मुद्रेवरील आक्रसलेल्या रेषा न्याहाळण्यांत मी चूर !

चमचमतें पाणी, तिरपे सूर्यकिरण, देऊळ, रस्ता
अवघा अवकाश एकाग्र, स्तब्ध.
ती बोलते, बोलतेच बोलते एकसारखी
कांही क्षणांपुरती खूप मनमोकळी, विश्रब्ध.

एक विश्व उघडून मिटतें....दिसतें ओझरतें रहस्यमय अंतरंग
मी बोलूं धजत नाही, करीत नाही तिच्या एकतानतेचा भंग.

आतां आम्ही परत फिरलों आहोंत
मिळणार आहेत आपापलीं खाजगी जगें आम्हांला
हें रहस्य तिष्ठत राहील इथेंच अनंत काळ
मावळता सूर्य, अनोळखी देऊळ, अपरिचित रस्ता साक्षीला.

## गूढ

आकाशपात्राखालीं झाकलेला हा निर्मनुष्य निवांत
थेंबाथेंबाने ठिबकतो आहे पसरतो आहे शांततेचा द्रव
झाडें श्वास रोधून उभीं : पान पान थबकलेलें अचल
चाहूल नाहीं कसलीच, नाहीं वाऱ्याचाही पायरव.

क्षितिजाची सकरुण दृष्टी, आभाळाचें अर्थपूर्ण मौन
दूरच्या डोंगररांगांचा सक्त जागता निळा पहारा
पायांतळींचें गवतदेखील गहन जाणिवेनें भारावलेलें
इथल्या फुलांतून बघतें कुणी कीं भासच सारा?

मधूनच सारा परिसर हिनकळतो स्थिर होतो पुन्हां
मधूनच एखादा श्रांत उसासा....आसवांचा वास....
कोणतें गूढ आहे इथें अजूनही अदृश्यपणें वावरत?
इथल्या हवेंतून कुणाचे मिसळले आहेत श्वास?

कुठल्या अपुऱ्या स्वप्नाचे तुकडे इथें विखुरलेले?
कोणतें जीवननाटय इथें कधीं घडून गेलें?

जमिनींतून आभाळाला भिडलेले सरळसोट वृक्ष
उलट्या विहिरीचा तळ तसा मधला निळा गोल
चहूं दिशांनीं उतरत आलेल्या गहनगूढ सावल्या
झेपावत हेलकावणाऱ्या फांद्यांचे विकट हिंदोल

पावलांपाशीं सळसळणाऱ्या वेलींच्या हिरव्या नागिणी
उग्र कातरकडांच्या पसरलेल्या रुंद फणा;
हलत्या कवडशांचे झळझळणारे रत्नमणी असंख्य
अवचित साधतात किरण : बधिर करतात मना!

गिळून टाकणारी ही शांतता, हें रागीट परकेपण,
जाणवत आहे सारखी हिरव्या श्वासांची धग
कशी कुठून आलें इथें अडकलें या चक्रव्यूहांत?
मागें हरवून आलें कशी माझें सावध जग?

माझ्यासाठींच वळणावर टपून होतें हें रान?
इथलें पान पान एक सांकेतिक लिपी भयाण
वाटतें कुठल्याही झाडाआडून चमकतील हिंस्र डोळे
ताणला जाईल तीरकमठा, सुटेल विषाचा बाण.

## व्रत

ज्या क्षणाला घेतला मी सूर्यसुमनाचा वसा
आंधळ्या वेड्या व्रताचा लाभला मज वारसा !
सूर्य माझें विश्व आतां, सूर्य माझें गगनही
रेखली सूर्यासभोतीं पावलांखालीं मही.

सूर्यशूलीं मी मला विंधून आहे घेतलें
दुःखभोगा ये रुची सुख काय सांगू त्यांतलें ?
पाकळ्यांनीं वेढुनीया सूर्य धरला मी उरीं
जाळणारी आग रुजली खोल माझ्या अंतरीं.

पाय मी देऊन त्याला रोधिली माझी गती
वाट एकाकी व्रताची अन्य नाहीं सोबती.
आणि आता सूर्य-मी हा भेदही ना राहिला
या परागांतून त्याला उगवता मी पाहिला.

सूर्यसुमनाच्या व्रताची हीच अंतिम सांगता
लाभहानीचा अशा का अर्थ येतो सांगतां ?

## समुद्रगंध

निळा निळा समुद्र आणि बेट पाचुचें मध्यें
तिथेंच मी, तिथेंच मी : मनांत कोणिसें वदे

उभा समोर वृद्ध माड हालवीत झावळी
जळांत गाइ अप्सरा उदास धून सावळी

निळी निळी सुरेल लाट रत्नचूर सांडतो
फुटून फेस मोकळा नवीन साज मांडतो

नभावरी मनाहुनी विचित्र रंग पेटती
नसानसांत आर्द्रसे समुद्रगंध दाटती.

पुराण शिंपल्यामधून गाज तीच ये पुन्हां
तळांत खोल जागल्या अनंत जन्मिच्या खुणा.

रितेच हात राहिले स्मृती कितीक वेचुनी
निळा निळा समुद्र गूढ मिटुन जाय लोचनीं.

## कारवां

उठे काफिला चाले पुढतीं लांब रांग उंटांची
संथ सरकती साथ तियेला गळ्यांतल्या घंटांची

निळें निळें हिमकंपित अंतर, थरथरणाऱ्या तारा
तीक्ष्ण सुईसम सरकत जातो देहामधुन शहारा.

वाळवंट विस्तीर्ण पसरलें त्यास ऐल ना पैल
चार खजूरी उभ्या, तळाशीं झुले सावली सैल.

उठले तंबू उपटुन मेखा तुटति तणावे सारे
निघे करावां अवचित येतां दुरुनी गूढ इषारे.

सुन्न शांतता तिचाच राहे भरून कानीं नाद
कुणि कुहरांतुन दे आरोळी भयाण ये पडसाद !

मुकेपणानें उंट चालले क्षितिजाच्या रोखानें
वाळूवरती उठती मिटती निमिषांचीं पदचिन्हें.

## सराटा

सराटा कसा असतो तें मला आतां आठवत नाहीं.
तसें बाळपण गेलें माझें आडगावांत, खेड्यांत,
हिंडलें आहे मी खूप काटयाकुटयांत, दगडागोट्यांत
तेंव्हां मऊ तळव्यांना अनेकदां सराटे टोचले
त्यांची तळपायांवर खूणही राहिली नाहीं.

सराटा कसा दिसतो तें मी विसरलें आहें
सराटयाचें रंगरूप....त्याचें शास्त्रीय नांव....
हिरवे काटे पिवळे पडतांना होणारी प्रक्रिया
रेशमी मऊपणांत नकळत भरत जाणारी कांटेरी हिंस्रता
कसें घडतें हें सारें....कांहीं मला माहीत नाहीं.

तरी देखील डांबरी गुळगुळीत साफ राजरस्त्यावरून चालतांना
निबर तळपायांना सराटयाची बोच आजही कशी जाणवते ?
एखाद्या रात्रीं पहिल्या झोपेंतून अचानक जाग आल्यावर
सारें अंथरूणच एक अजस्र सराटा कसें बनतें ?

## कळतें आहे

कळतें आहे : नसेल केली मनाजोगती साथ
जुळतां जुळतां तुटले असतिल कोमल कांहीं धागे
आणि ठाकतां उभे उभयतां प्रळयाच्या काठाशीं
अवघड वेळीं असेनही वा भिऊन वळलें मागें

कळतें सारें : तरी सांगतें स्मरून माझ्या हृदया
हास्यामागें आंसूंभरली सतत आठवण होती
बरसत गेले मेघ नभांतुन किती, न गणती केली
आज परंतू मुकी आणखी सोशिक आहे माती.

# हें एक झाड आहे

हें एक झाड आहे : याचें माझें नातें
वाऱ्याची एकच झुळूक दोघांवरून जाते.

मला आवडतो याच्या फुलांचा वास
वासामधून उमटणारे जाणीवओले भास.

पहिल्यानेंच याची मोहरतांना फांदी
ठेवलीं होतीं बाळगाणीं याच्या कटिखांदीं.

मातीचें झाड : झाडाची मी : माझी पुन्हां माती
याच्या पानावरच्या रेषा माझ्या तळहातीं

ढळपी ढळपी सुटून मुळें झालीं सैल
रुजतें आहे झाड माझ्या रक्ताच्याही पैल.

कधीं तरी एके दिवशीं मीच झाड होईन,
पानांमधून ओळखीचें जुनें गाणें गाईन.

## आटपाट

आटपाट नगराची
कुठुन कशी वाट?
कोठें तें खोल तळें
तो कुठला घाट?

पुत्र कुणी कोणाचा
बुडवला तळ्यांत?
गुदमरलें गीत कुठें?
कोणत्या गळ्यांत?

गुपित उरीं घेउनियां
संथ संथ लाटा
अजुनीही असतिल का
भिजवित त्या काठा?

भरलेल्या आभाळीं
खिन्न झुरे सांज
मंदिरांत आरतिची
वाजतसे झांज.

ऊर कोण फोडुनिया
आर्त गीत गातें?
कोणाचें पाउल तें
दूर दूर जातें?

आटपाट नगराचा
मार्ग वाहणीचा,
कोठें तो शेवट त्या
गूढ कहाणीचा?

## अचानकसा

अचानकसा एक रस्ता
भ्रमिष्ट, गोंधळलेला
वाटेंत घुटमळून, पुन्हां
मागें वळलेला !

अचानकसा काळोख, त्यांत
मिणमिणणारा दिवा
अनंत संभव पोटीं घेतलेली
गर्भवती हवा.

अचानकसें माझेंच मला
सामोरलेलें रूप
अशब्द झालेली मी, असून
बोलायचें खूप !

# गेलेल्या असंख्य दिवसांमधून

गेलेल्या असंख्य दिवसांमधून कांहींच हातांत राहिलें नाहीं
अज्ञातामधून आलेला प्रवाह तसाच पुढतीं वाहत राही
सुनेपणांतच सरतात क्षण, एकही जाऊन भिडेना खोल
ओहोटी लागून जीवातळींची वाटतें सुकत चालली ओल.

अर्ध्यांत मोडून पडलीं चित्रें अवशेष कधीं धरती फेर
एकच एक निरर्थपण दाटून राहतें आंतबाहेर
विजनामध्यें बुडून गेल्या विजनामधल्या पाऊलवाटा
विशीर्ण झालेल्या गुलाबासंगें बोथट होऊन झडला कांटा

चुकून कधीं प्रिय कवितेची अर्धीमुर्धी ओळ ओठांत येई
शब्दच सारे बनती धुकें, पुढलें मागलें दिसेना कांहीं,
उदास एखाद्या सांजेच्या वेळीं चाटून जाते अनाम धार
वाटतें गेलें वायांच सारें : वाटतें झाला उशीर फार.

वाहत्या जळीं पायांतळींची निसटते आहे वाळू सारखी
भरल्या डोळ्यांनीं बिंब पाहतां माझी साउलीही होते पारखी....

## हवीच का ?

हवीच का अहोरात्र नसांतली अस्वस्थ धडधड ?
हवेतच का आंतून गदगदून येणारे हे कढ ?
संथपणें सरकत जावेत ऋतु नुसते देहावरून
ओसरतांना सहजगत्या जीव पुन्हा यावा भरून.

मनांतलीं अरण्यें एकामागून एक अलगद उघडतात
हलतात कवडंसे : भुईवर असंख्य सावल्या पडतात;
आपण नुसतें हिंडत असावें पावलांनीं अनवाणी
गुणगुणत मनापलिकडचीं गूढ, अश्रुत गाणीं !

## मुकाट

मुकाट रानें मुकाट पानें मुकाट सळसळ वारे
अथांग वरचें शून्य त्यामध्यें दोन पुसटसे तारे
पसरत येत्या किरपणाची जिवास भिडते धार
क्षणाक्षणांतुन साकळताहे काळोखाचा भार

स्तब्ध मूकतेमध्यें विसर्जन हो अवघ्या भावांचें
अशा घडीला भान कुणाला नांवाचें गांवाचें ?
अशाच वेळीं हवेंतलाही जडावतो कां पारा ?
श्वास रोधुनी कोण ठेवितें हा अदृश्य पहारा ?

# गिचमीड

तापलेला रस्ता : वितळणारें डांबर : चटचटणारे पाय
बुबुळांत ठणकणारे डोळे श्रांत, सुन्न, असहाय
अंगांतला कण कण उकळवणारी उन्हाची तीव्र धार
साऱ्यांतून पुन्हां वेगळेंच आभाळ गडद, निळेंशार.

रस्त्याकडेचा एक वेडा चिंधीही नसलेला अंगावर
ज्योतिष्याच्या पिंजऱ्यांतल्या चिमण्यांची सुंदरता निमूटभर
लवलवणारीं पिंपळपानें : डोळ्यांमधला निर्भर उत्सव :
हवेमधून दाटत आलेले अज्ञात संभव....असंभव....

एखादेंच आत्मरत फूल गवतांत उगीच हसणारें
जीवनाचे असंख्य तुकडे दिसणारे....न दिसणारे....
धडधडणारें प्रचंड यंत्र : वाफारलेली गरम हवा
भर दिवसा काळोखांत खोल मिणमिणणारा दिवा

अर्थहीन क्लिष्ट चित्रें, आकृती, माझी यांत कुठें जागा ?
या साऱ्या गिचमिडींतून कुठें शोधूं माझा धागा ?

# नातें

या आभाळाचें कांहीं नातें असेल का त्या आभाळाशीं ?
दोन्हीं आभाळें भेटत असतील ? कुठें ? कोणत्या खुणेपाशीं ?
इथल्या झाडावरती कधीं येत असतील तिथले पक्षी ?
इथलें पाणी होत असेल तिथल्या प्रणयचित्रांचें साक्षी ?

तिकडून इकडे येतांना तर भुई सर्वत्र होती सलग
तिथल्या इथल्या वाऱ्यांमधून एक चांदणें, एकच धग.
मध्येच नाहीं का हात उंचावून फांदीवरचीं फुलें खुडलीं ?
तेव्हां त्याच सुगंधाची लहर प्राणांनाही भिडली.

आभाळ, झाडें, पाणी, भुई, सुवास—सारें एकच जर
खोल जाणवत होतें कुठलें हेतुशून्य अधांतर ?

## आठवणींच्या वासानें

सारीं घरें अनोळखी साऱ्या वाटा अनोळखी
कॉंक्रीटखालीं पुरली गेली हळवी मऊ माती
देवळामधला मारुती परका परका वाटतो
शेंदरावर नवीं पुटें चढलीं असतील किती.

वेशीवरचा प्रचंड पिंपळ आज किती खुजा!
सळसळणारीं पानें बोलतात न कळणारी बोली
कोडफुटल्या मशिदीला वार्धक्याची सजा
विहिरीमधून ठणकणारी एक जखम ओली.

कोंवळे अंकुर झालीं आतां जून जरड झाडें
आठवणींच्या वासानें जडावलेली हवा
दगडविटांत पाय रोवून उभे पडके वाडे
प्रत्येक जुन्या धडावरती एक चेहरा नवा.

पावलांवाचून पायरव : दचकवणारे भास
पाठीवरती जाणवतो पुसट कुणाचा श्वास?

फोर्ट : एक दुपार

रस्त्यावरून चालणारीं माणसें, जाणारीं उलटसुलट दिशेनें
पायांत पाय अडकवणारीं माणसें, झिंगलेलीं उन्हाच्या नशेनें
माणसें चालतांना थबकणारीं, तरंगल्यागत दुहेरी दिसणारीं
माणसें घामट : हातवारे करणारीं : तिरळीं : निरर्थ हसणारीं !

अर्थशून्य आवाजांचा गुंतवळा, त्यांत विणलेलें आक्रंदन
बसचा लाल वळसा, टॅक्सीची धडधड, यंत्रांचें निर्मम स्पंदन
आवाजांच्या असंख्य आकृती उमटतात. मिटतात. बदलतात.
आवाज उसळतो वरच्यावर, खालीं निर्जीव पुतळे हलतात.

झळझळतें आभाळ भोवळतें, सरकतें वर, जातें दूर
जमीन पायांखालून सुटते, उसळतो-घुसळतो मानवी पूर
अंधारणाऱ्या नजरेपुढे उन्हाच्या किती कांचा फुटतात
पाणावतात डोळे, धडधडते छाती, देहापासून अवयव सुटतात.

डोळ्यांमागल्या मेंदूंत तडकतें कांहीं, फुटतें, पसरतें अस्ताव्यस्त आंत,
माझे पाय माझ्यापासून अलग होतात, दूर निघून जातात.

## तटस्थ

रस्त्यावर अचानक फुटून विखुरलेला एक क्षण
मुंग्यांसारख्या भुळभुळत सर्वत्र पळणाऱ्या मोटारी
चावी देऊन गतिमान केलेलीं स्प्रिंगचीं माणसें
आणि दुतर्फा उंच इमारतींच्या हारीच्या हारी.

दगड, विटा, सिमेंट, पोलाद, लोखंड, वीजतारा
समर्थपणे पिळून उभारलेला अजस्र डोलारा
कुण्या कलावंत हातानें आकारलें हें विचित्र
आणि मांडून ठेवलें असें इथें....तिथें....सर्वत्र ?

माझ्या अंतस्थ स्वप्नांतून मींच मला जागें केलें
भयावह पराव्यांत मींच मला भिरकावून दिलें
हवेचा पदर हातीं धरूं बघतें तोही निसटून जातो
आंतल्या आंत रक्तवेगानें प्राण धडकत राहतो.

एका खिडकीचा दुभंगतो पडदा....बघतात डोळे निर्विकार
कुंडीमधला लालभडक गुलाब, एक तटस्थ साक्षीदार.

## कनॉट प्लेस

झगमगत गोल फिरणारे उंच दिमाखदार दिवे
मिटते उघडते कवडसे, कवडशांचे थवे, दिवे
क्षणाचें गडद आंधळेपण : क्षणाची डोळेदिपणी
खालून वर, वरून खालीं सरसरणारे दिवे.

अनिवार्य लाटेसह चेहरे दुरून जवळ येणारे
डोळे समपातळीवरून खोल डोळ्यांत बघणारे
एका क्षणाची अतर्क्य जवळीक : अर्थहीन श्वास
प्रकाशाच्या कोसळत्या लोटांत सारें पुन्हां पुसणारें.

हा परिसर अनोळखी, इमारती अनोळखी, अनोळखी हा वारा,
अनोळखी हा प्रकाश, हीं माणसें, हा अवाढव्य पसारा,
उंच उसळणारें कारंजें : गालाला बिलगलेला थेंब
कुठल्या प्रवाहांतून कुठें वाहत आलेली ही जळधारा....

झगमगत गोल फिरणारे उंच दिमाखदार दिवे
आपलेपणा पुसून टाकणारें क्रूर एकाकीपण नवें.

# पैठण

जागजागीं खांडे पडलेला रोड गोदेचा प्रवाह
आणि अलिकडे उघडें अपार दीर्घ वाळवंट
निर्जन उद्गस पाषाणी घाटांची
दूरवर मंद अस्पष्टती रेषा;
पायऱ्यांवरतीं एकटी उभी मी
हरवून पार गेलेली स्वतःला
अंगाशीं झोंबत्या अस्वस्थ वाऱ्याची
उकलूं बघत अनाहत भाषा!

आणखी पल्याड सातवाहनांची पालथी नगरी
खोल चरांतून बसली जपत
उराशीं धरल्या भग्न अवशेषा.

पिंपळपानांची गर्द सळसळ
अनाकलनीयपणें जाणवता कस्तुरीबुक्क्याचा सूक्ष्म परिमळ
निंबाऱ्याखालतीं भुईला नाक टेकवलेलें
निमूट गवत कुरतडणारें एक गाढव....

अवघें पैठण पूर्ण शांतिब्रह्म
विरक्त उदास
कठोर निर्मम झळा फेकणारें वरतीं आकाश.

# भूतकाळाचा एक तुकडा

त्या रस्त्याने मोटार जातांना मन खूप मागें फेकलें गेलें
जुन्या आठवणींचें प्रचंड वादळ माझ्याभोवतीं घोंघावत आलें
भूतकाळाचा एक तुकडा अलगद कापून ठेवावा तसा तो गांव
जुनाट, कळाहीन, उद्ध्वस्त....मला कळलेंही नाहीं त्याचें नांव!

वाणसामानाचें दुकान हिंगजिऱ्याच्या गूळखोबऱ्याच्या वासाचें
तिथले अंधार सरमिसळ माझ्या हरवलेल्या श्वासांचे
अताराच्या फळीवरचें हळदकुंकू : लालहिरव्या कागदी झिळमिळ्या,
कुण्या कुंवार भाळीं रुळणाऱ्या लाजऱ्या साजऱ्या मुंडावळ्या,

एका अर्धवट उघड्या दाराआडून चमकलेला हिरवागार टोपपदर,
रखरख पिकलेल्या म्हाताऱ्याची क्षितिजावर खिळलेली नजर,
इथल्या कठल्याही चुलीवर तेंच सनातन अन्न शिजत असेल
भाकरीच्या खरपूस घासांतून माझेंच बाळपण रुजत असेल!

जन्माजन्माची प्रदक्षिणा एका क्षणांत करून आलें मन
मोटार मैल ओलांडून पुढें आली....अजून मागें भ्रमत आहे मन.

## अश्वत्थ

सळसळत सर्वभर फिरणारा अवखळ वारा
आणि चमचम चमकणारी झळझळती पालवी
हें उतावीळ रहस्य सर्वांगांतून बाहेर फुटूं पाहणारें
पानापानांवर लवलवणारी ही टवटवी नवी;

भुईच्या पोटांतून आलेलें एक आश्चर्य....हा वृक्ष
हा अत्यंत पुरातन आणि हा अर्वाचीन उद्यांहून
बलिष्ठ बाहू तसा याचा ताठ बुंधा, आणि—
डेरेदार हिरवें शिखर जशी उभार मूठ यावी वळून.

कुठल्या कुठल्या रानावनांत रात्रीं हा येतो फिरून ?
कुठलीं चित्रें नजरेपुढें रंगवतो हसतो दुरून ?
याच्या मुळांसह मी भुईंतला काळोख चाचपतें
याच्या पानांसह सळसळत आभाळाचा वेध घेतें.

## संभव

खिडकीवरती हलते आहे किलबिलणारी एक फांदी
पहाटणाऱ्या दिवसाची स्वरमय मूर्त होते नांदी
गच्च भरल्या आभाळाचा निवळ होत आहे तळ
सावळेपण हळूहळू होत आहे उजळ उजळ—

काळोखाचे, उजेडाचे थरावरती हलती थर
खालींवर आजूबाजू व्यापून अवघें अधांतर
कोण कुणांत मिसळत आहे, अलग कुणामधून कोण ?
दोन्ही मिळून एक किंवा एकाचे हे होती दोन ?

नवा संभव पोटीं घेऊन वाट चालताहेत क्षण
सळसळणाऱ्या पानाला मिळत आहे अंग, मन
उमलणाऱ्या फुलासाठीं सुगंधाचे अस्फुट भास
वारा इतका अस्पर्श नवा जसा तान्हा तान्हा श्वास !

एक नवा ताजा दिवस येत आहे देवाघरून
प्राणांत सुख मावत नाहीं, जीव येतो भरून भरून !

## दरवळत डोळूं लागतात

माळरानावरून सरकत येणाऱ्या ढगांच्या सावल्या
क्षितिजाआड फिकट गुलाबी संधिप्रकाश
गवतांतून मळ्ल उन्हाचीं संथ फिरणारीं बोटें
ओल्यागार हवेंत घननीळ भास-आभास;

कोरडी धूळ शहारत उठते, फिरते स्वतःभोवतीं
सरकत येणाऱ्या ढगांच्या सावल्या शिरतात मनांत
दरवळत डोळूं लागतात हिरवेगर्द वनमोर
हृदयांतच सुरू होते घनदाट बरसात.

## डोंगरावर

डोंगरावर सपाट जागीं मी उभी, वर ओथंबलेलें आभाळ,
स्वच्छ निळाईंत डवरून आलेली ढगांची शुभ्र माळ,
सुसाट वारे अंगाला झोंबणारे, पदर खेचणारे, आग्रही,
प्रत्येक गवतपात्यावर तिरप्या सूर्यकिरणाची सोनेरी सही.

छाती भरभरून घेतला श्वास मीं, प्यायलें निर्भर वारा
डोळे विस्फारून आंत भिनवला, भिनवला आसमंत सारा
वाटलें मला मी साऱ्या जगाहून उंच, अस्पर्श, अलग
उजळून आली आंतून आंतून एक अलौकिक झगमग.

दूर खालीं दरींत अनामिक गांव, भातुकलीच्या खेळांत मांडलेलें.
तिरप्या उन्हाचे झोतच्या झोत वरून खालीं सांडलेले
विश्वाकार व्यथा सामावली संपुटांत, गेली पार वाहून—
दैवी समाधानांत निघाली अवघी अंतःसृष्टी नाहून !

आला तसाच तो क्षण कालप्रवाहांत वाहून गेला
सुख इतकें साधें असतें, तेव्हां कळलेंच नव्हतें मला—

# निश्चल

समोरचें झाड हिरवेंगार, अवकाशांत बिंबलेलें, स्तब्ध, अचल
स्तब्ध पलिकडे सर्वदूर पसरलेलें निळेंभोर आभाळ
संथपणें तरंगत जाणारा एक मुक्त विलासी ढग
आणि त्यावरून उडणारी शुभ्र शुभ्र बगळ्यांची माळ.

हा रस्ता असाच सरळ दूरवर गेला आहे,
सांडलें आहे त्यावर ठायीं ठायीं पिवळेंधमक ऊन;
निश्चल आहे खिडकीबाहेरची सायलीची तरुण वेल
आळसावलेलें एक फूलपांखरूं उडतें आहे मधून मधून.

या साऱ्यांचें मिळून एक सुरेखसें चित्र बनतें
दुपारच्या शांततेचा फिरतो त्यावर हलकासा हात,
सुषुप्तीचा जडपणा अलगद पापणीवर उतरतो
एक गोड तंद्री सर्वांगांतून येते वाहात!

जग सारें वाटतें इथून दूर, धूसर, अस्पष्ट,
जसा हजारों वर्षांपूर्वीं घडून गेलेला इतिहास,
किंवा वाचलेली क्षुल्लक घटना, झोपेंतलें एक दुःस्वप्न—
छाया देखील ज्याची पोचूं शकत नाहीं आसपास.

या क्षणीं मी पाहातें आहे फक्त हें निळेंभोर आभाळ
झाड, वाट, ऊन, वेल, फूलपांखरूं, ढग, बगळ्यांची माळ.

# फुलें

क्षणोक्षणीं गडद होत जाणारी रात्र, काळीभोर
आणि माझ्या खिडकीखालीं उमलणारीं मोगऱ्याचीं फुलें
हें आटलेलें सूर्यतेज, प्रकाशाचीं अंतर्वर्ती केंद्रें चिमुकलीं
निर्मळ शुभ्रपण काळोखानेंच हृदयांत जपलेलें.

मध्येंच सुवास दरवळत येतो, अर्धविस्मृत आठवणी,
स्वप्नांत स्वप्न पडावें तसें दाटतें धूसरपण....
रात्र गडद होत जाते, शांततेची लय लागते
रितें रितें होतें, अवकाशांत बुडतें मन !

कळत नाहीं माझें मला, साऱ्यांत मी पसरतें आहे
की सारें माझ्या ठायीं सामावतें आहे ओतप्रोत ?
अशा वेळीं जीव कसा भरून येतो काठोकाठ
उमगतो जन्मजाह्नवीचा सनातन मूलस्रोत.

हें भरलेंपण झांकून ठेवीन माझ्या दक्ष पापण्यांनीं
आंतल्या काळोखांत उमलतील मोगऱ्यासारखीं शुभ्र गाणीं.

## चांदणें

चांदणें मंद अलवार, बाळपणाची कोवळीक ल्यालेलें
चांदणें पाण्याहून नितळ, चांदण्याहून शीतळ झालेलें
चांदणें कवितेसारखें मृदु झिरपणारें खोल मनांत
चांदणें जाईजुईचमेलीचें....बेला फूले आधी रात.

चांदणें अपार, अपरंपार, वर्षणारें धुवांधार,
चांदणें आग्रही, अतिरेकी, थंड, क्रूर, अनिवार,
चांदणें फिरतें, बदलतें, अवचित बनतें पोलादी धार
उघड्या अंगावर अनिवार्यपणें सपासप घालतें वार.

चांदणें चहूं दिशांनीं वेढत वेढत जवळ येतें
चांदणें देहहीन, अमानुष बोटें आत्म्यावरून फिरवतें
चांदणें विखुरतें मूक शवें हरवलेल्या श्वासांचीं
चांदणें : हलणारी एक झुळूक खिन्न स्मशानवासाची.

चांदणें शिरतें आंत आंत, पसरत जातें रक्तभर
चांदणें प्रत्येक पेशीमध्यें पेटवतें निळें काळें जहर
चांदणें गळ्यांतून वर चढतें, जिभेवर उलटून येतें फिरून,
गोठत जातो शब्द शब्द, आत्मा पुढ्यांत पडतो मरून.

## पाळणा

उलटें आकाशपात्र
त्याच्या तळाशीं चार झुरुमुरू चांदण्या
क्षितिजाचा घेर भोवती आवळत असलेला
अलगद वर उचलतो एक अदृश्य तळहात मला !

पाहतां पाहतां खालीं खालीं जाते जमीन....
मागें पुढें झुलत राहातो अवकाशाचा पाळणा
जवळ जवळ येतो वर टांगलेला चांदण्यांचा खेळणा !

# सावली

भर दुपार : रस्त्याच्या कडेला मी उभी
माझ्या पाठीशीं उभें एक झाड
आणि माझ्यासमोर त्याची सावली पसरलेली.

झाडाचा बुंधा काळा, फांद्या काळ्याकरड्या,
हिरवींगार त्याचीं पानें, वर निळाजांभळा मोहर
चमकदार काळ्या पंखांचा एक कावळाही फांदीवर.

झाडांत अनेक रंग—काळा, करडा, हिरवा, निळाजांभळा,
माझ्यासमोरची सावली मात्र फक्त काळी
बुंधा काळा, फांद्या काळ्या, पालवी काळी
मोहर काळा आणि कावळाही काळाच

सारे रंग भेदभाव विसरून काळेपणात एकवटलेले
झाडाला त्याचें झाडपण सावलींत भेटलेलें—
झाड स्वतःहून सावलींत जिवंत.

# कधीं लागले दुर्गम कडे

कधीं लागले दुर्गम कडे, कधीं होते अवघड घाट;
किती चढउतार, वळणें, कुठून कुठवर आली वाट.
किर्र कर्कश जाळीमधून कधीं गूढ हुंकार आला
लाल पेटत्या जाळांत कधीं प्रकाशाचा अस्त झाला.

एन दुपारीं माथां सूर्य : पायांखालीं फुटली लाही
तरी सारें दुस्सह होतें असें म्हणतां येणार नाहीं.
जेव्हां गर्द जंजाळांत माझीं पावलें हरवून गेलीं
तेव्हां भव्य ऐश्वर्याची मिरवणूक पुढें आली.

मुठीयेवढें निळें पाखरूं त्यानें गोड सूर दिले
ओळखीचें हंसू हंसलीं गवतामधलीं अनाम फुलें
दगडालाही फुटला पान्हा माझ्या कोरड्या ओठांसाठीं
वत्सल वारा देवासारखा भरून होता पुढें-पाठीं.

आतां दिवस कलला आहे, हळवें झालें आहे ऊन
मला माझें सुख कळतें जडावल्याही श्वासांमधून
झुळझुळणारी मंद झुळूक भाळावरचा थेंब टिपते
क्षितिज होतें जवळ....दूर....जरा दिसतें, जरा लपतें.

# वळणांतुनी वळतो पुन्हां

किति सारखी चढते तरी चढणीवरी चढ रेलला
वळणांतुनी वळतो पुन्हां रस्ता कुठें हा चालला ?

हरवून माझी वाट मी येऊन कोठें पोचलें ?
दगडापरी जड जाहलें जें फूल हातीं वेचलें;
कां पक्षिही व्हावा मुका फांदींतुनी जो बोलला
वळणांतुनी वळतो पुन्हां रस्ता कुठें हा चालला ?

अजुनीहि दूरच दूरचीं क्षितिजें दुरून खुणाविती
ढग पेटल्या पलित्यापरी दुरुनी इषारा दाविती
तुकडा नभाचा भासतो मधुनी जरासा हालला
वळणांतुनी वळतो पुन्हां रस्ता कुठें हा चालला ?

हिरवेपणा हरवूनियां झाडें उभीं परक्यापरी
निःस्तब्ध क्रूर नकारसा कर आडवा कोणी धरी
फुटला न ओठीं हुंदका का तोच कोणीं झेलला
वळणांतुनी वळतो पुन्हां रस्ता कुठें हा चालला ?

## कोण आलें कोण गेलें

कोण आलें कोण गेलें उमगलें नाहीं मला
ओळखीचा भास कांही मात्र भंवतीं तरळला !

उघडला पडदा जरासा मंद झुलल्या झालरी
तो पुराणा गंध येतां झुळूक झाली बावरी
पाकळ्या गाळीत खालीं वेल दारीं हालला.

शीळ कोणीं घातली का ? कोण हलकें हांसलें ?
काय कोणी बोललें वा फक्त मज तें भासलें ?
मोकळ्या वाऱ्यांतुनी का सूर वेडा कांपला ?

जवळ आलें कोण मागें ? श्वास ये मानेवरी
धडधडूं काळीज लागे दाटतां भीती उरीं
गर्द झाली ही हवाही कोपरा काळोखला.

भासभोळीं इंद्रजालें कीं भ्रमाचे भोवरे ?
कोठली अज्ञात छाया आज भंवतीं वावरे ?
स्वप्न किंवा जागृती कांही कळेना हें मला !

कोण आलें कोण गेलें भेट ही झाली कशी ?
नकळतां डोळ्यांत माझ्या आसवें आलीं कशीं ?
पाळला संकेत कोणी कोणत्या जन्मांतला ?

## साऱ्याच पायवाटा

साऱ्याच पायवाटा पुसणार का इथें?
कोणीच ओळखीचें नसणार का इथें?

होऊन कांहिं गेलें काळांत कोठल्या
त्याचीच रुद्ध छाया असणार का इथें?

उध्वस्त स्मारकांतुन या भग्नतेंतुनी
माझेंच भूत मजला दिसणार का इथें?

पाषाण हालवीतां एकेक, खालचे—
विंचू जुन्या स्मृतींचे डसणार का इथें?

होऊन भावनावश मी कंठ दाटतां
हा आसमंत निष्ठुर हसणार का इथें?

आशाळभूत आशा वेड्या जिवांतली
निर्माल्य शीर्ण राखित बसणार का इथें?

## हें रान चेहऱ्यांचें

हें रान चेहऱ्यांचें माझ्या सभोवतीं
नाहीं इथें जिवाचा कोणीच सोबती.

हीं माणसें म्हणूं कीं हीं क्रूर श्वापदें?
भेसूर सावल्या कीं तिमिरांत हालती?

घेऊन गूढ पोटीं विक्राळशा गुहा
प्रत्येक चेहऱ्याच्या आडून पाहती

दावीत स्वप्नसुंदर ओल्या मरीचिका
येथील पायवाटा दूरांत धावती

विश्रब्ध भावनेनें टेकीन या शिरा
जागा अशी निरामय नाहीं कुठेंच ती

कल्लोळ गर्जनांचा वाढे क्षणोक्षणीं
मी सूर अंतरींचा येथें जपूं किती?

हें रान चेहऱ्यांचें घेरीत ये असें
माझ्याहि चेहऱ्याची मजला न शाश्वती

मरणमहालांतून

मरणमहालांतून आलेला एक कवडसा
अचानक उधळून जातो सारा अंधार
त्याची तीक्ष्ण पोलादी धार
जाते इथून तिथपर्यंत थेट, कापीत,
वेगळा करीत अवघा ज्ञात परिसर
दुभंगतें जाणिवेचें विश्व :

जें जें येतें त्याच्या प्रकाशकक्षेंत
तें होतें सारें अलग भोवतालापासून
घेऊन वर मर्त्यतेची मोहर
त्याचे दिवस होतात सीमित, रात्री मोजलेल्या
फुटून उद्‌ध्वस्त होतात मनीषा योजलेल्या
उरतात मागें वारुळें बुजबुजलेलीं कृमिकीटकांनी
एकाच वेळीं घृणास्पद आणि केविलवाणीं—
आणि प्रत्येक ठिकाणीं दिसूं लागतात
माझेच अनेक चेहरे विरघळत जाणारे
विरतांना उदास गर्वगीत गाणारे....

मरणमहालांतून आलेला एक कवडसा
—अनिवार्य ठसा !

गोंदण २०१

# पिकनिक संपत आली आहे

पिकनिक संपत आली आहे
बागेवर संध्याकाळच्या शांत सावल्या लांबत आहेत.

सकाळचा कोवळा उल्हास
आणि दुपारच्या उन्हाचे चटके,
गप्पागोष्टी तोंडीं लावीत केलेला फराळ,
गर्दीत अवचित गवसलेला एकान्त,
हास्याचे रंगीन गुच्छ....सुरांचे तुरे....
सारेंच कसें बघतां बघतां ओसरून गेलें.

आतां झाडांचे हळूहळू बनत आहेत राक्षस
आणि त्यांच्या तळाशीं सांचत आहे काळोखाचा डोह.

उरलेल्या अन्नावर मुंग्या जमूं लागल्या,
एखादा कावळाही करकरत घिरट्या घालूं लागला,

पिकनिक संपत आली आहे
बागेवर संध्याकाळच्या शांत सावल्या लांबत आहेत

## अनासक्त तारे वारे

अनासक्त तारे वारे : मार्ग आखलेले
उदासीन भूवर माझे पाय रोखलेले
अनासक्त तारे वारे : सदासक्त मी ही
युती मात्र निमिषार्धाची, पुन्हां भेट नाहीं !

REFBK-0020787
REFBK-0020787
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## कधींतरी

कधींतरी कुठेंतरी एक उमललें फूल
त्याच्या आभाळगंधाची पडे अनंताला भूल
तेव्हांपासून, तसेंच, जिणें तेथेंच थांबलें
जगण्याचे फक्त पुढें भासआभास लांबले.

## ऊन कोवळें

ऊन कोवळें
गार सावली
अजुन डहाळी झुले,

अजून माझी
उत्सुक ओंजळ
अजून ताजीं फुलें.

२०७८८
काव्य

## बाकी

अजून थोडें आहे बाकी
या रक्ताचें करणें पाणी
अजून थोडें—आणिक नंतर
सरेल तेव्हां सरो कहाणी.